## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०७/०४/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२६/२०१२/जा.२२८, दिनांक १२/०४/२०१२, ०२/०५/२०१२ व १७/०५/२०१२.
३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२६/२०१२/जा.२२९, दिनांक १२/०४/२०१२.
४) पोलिस उपनिरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे यांचेकडून दिनांक २५/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.
५) जप्त साठ्याचे मालक अमित हरिभाई भानुशाली यांचा दिनांक १६/०५/२०१२ रोजीचा लेखी जबाब.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२६/२०१२/जा. ६६८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :-२५/०५/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २९/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना खात्रीलायक बातमी मिळाली की, आत्माराम पाटील निवास, गाळा नं. ३, तळमजला मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व येथे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकांवर वितरीत होण्याकरिता दिलेल्या तांदूळ व गव्हाचा मोठ्या प्रमाणात साठा काळ्या बाजाराकरिता ठेवण्यात आलेला आहे. मिळालेल्या बातमीनुसार त्यांचे पथक, पंच तसेच पोलिस शिपाई निवृत्ती पांडुरंग भंसारे, बक्कल नं. ६३६४ व पोलिस शिपाई भगवान तुकाराम गिळंदे, बक्कल नं. ६५१७, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली पूर्व असे सर्वजन मिळून सायंकाळी १६.०० वाजता गाळा नं. ३ येथे उभे राहिले. सदरचा

गाळा हा बंद आढळला. त्यानंतर अधिकाऱ्यांनी गाळा नं. १ येथे चौकशी केली असता, सदरचा गाळा मयुर उर्फ महेश गोपाळ भानुशाली यांचा आहे, असे चौकशीत आढळून आले.

त्यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी मयुर उर्फ महेश भानुशाली या गाळाधारकास बोलावून घेतले असता, सदरचा गाळाधारक मयुर उर्फ महेश भानुशाली हा सायंकाळी १८.३० वाजता पंच व पोलिस यांच्या समक्ष उपस्थित झाला. पथकातील अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गाळाधारक मयुर उर्फ महेश भानुशाली याचेकडे सदर गाळ्यात कोणता व्यवसाय करीत आहे, याबाबत सखोल चौकशी केली असता, मयुर उर्फ महेश भानुशाली यांनी सदरचा गाळा हा आत्माराम पाटील या गाळा मालकाकडून मौखिक मुख्र जबानीनुसार भाडेपट्टीने किराणा मालांच्या व्यवसायाकरिता घेतलेला आहे व त्याबाबत तो त्यांना दरमहा रुपये ३,०००/- रोखीने भाडे गेल पाच महिन्यापासून नियमित देत आहे. तो त्या ठिकाणी त्याचा मावसभाऊ अमित हरिभाऊ भानुशाली यांना किराणा व्यवसायासाठी दिला आहे. तो त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचे भाडे/मोबदला घेत नाही. अमित भानुशाली सदर गाळ्यामध्ये किराण्याचा व्यवसाय किंवा अन्य इतर कोणता व्यवसाय करतात किंवा कसे, याबाबत त्याला काही माहित नाही, असे त्यांनी चौकशीत पंचांसमक्ष सांगितले व अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष तसा त्याचा जबाब नोंदवून घेतला आहे.

अधिकाऱ्यांनी मयुर उर्फ महेश भानुशाली यांना पंचांसमक्ष अमित भानुशाली यांना तातडीने बोलावून घेण्याची विनंती केली. त्यानुसार अमित भानुशाली हे गाळा नं. ३ येथे घटनास्थळी उपस्थित झाले. त्यांना अधिकाऱ्यांनी त्यांची व पंचांची ओळख्र पटवून दिली व सदरचा गाळा उघडण्याबाबत विनंती केली. त्याप्रमाणे अमित भानुशाली यांनी सदरचा गाळा नं. ३ उघडला व अधिकाऱ्यांनी व पंचांनी सदरच्या गाळ्यामध्ये प्रवेश केला असता, गाळ्यामध्ये ५० किलो भरतीच्या धान्याची पोती आढळून आल्या. सदर गाळयात प्रवेश करताना डाव्या बाजूस गहू तर उजव्या बाजूस तांदळाच्या ५० किलो भरतीच्या गोण्या एकावर एक रचून ठेवलेल्या आढळून आल्या. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदरच्या तांदूळ व गव्हाच्या पोत्यांची मोजदाद केली असता, सदर गाळ्यामध्ये सर्वसाधारण प्रतिच्या तांदळाच्या एकूण ११३ बाचके (प्रत्येकी ५० किलो भरतीच्या) व गव्हाच्या एकूण १६३ बाचके (प्रत्येकी ५० किलो भरतीच्या) आढळून आल्या. तसेच सदर गाळ्यामध्ये ५० किलो क्षमतेच्या इलेक्ट्रानिक्स वजन काटा (एक नग) तसेच इन्व्हेटर असलेले ट्युबलर १२ व्होल्टची बॅटरी तसेच १२ रिकाम्या बारदानाच्या गोण्या आढळून आल्या.

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष अमित भानुशाली याच्याकडे सदर गाळ्यामध्ये आढळलेल्या तांदूळ व गव्हाचा साठा कुठून हस्तगत केला, याबाबत सखोल चौकशी केली असता, अमित भानुशाली यांनी असे सांगितले की, सदरचा तांदूळ व गव्हाचा साठा सुनिल (पूर्ण नांव माहित नाही) या इसमाकडून रोखीने खरेदी केलेला आहे. अधिकाऱ्यांनी सदर साठ्याची रोख बिले तपासणीसाठी सादर करण्याची विनंती केली असता, धान्याचा पुरवठादार

0003

सुनिल यांनी रोखीच्या पावत्या त्याला दिल्या नाहीत असे अमित भानुशाली यांनी चौकशीत सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सुनिल या इसमाचा ठावठिकाणा काय आहे, त्याचा पत्ता काय आहे, याची विचारणा केली असता, अमित भानुशाली यांनी असे सांगितले की, सदरचा इसम नामे सुनिल हा त्याच्या गाळ्यामध्ये स्वत: येऊन तांदूळ व गहू हवे किंवा कसे, याची विचारपूस करीत असे व तो त्याला कमी भावाने (बाजारभावापेक्षाही कमी दराने) तांदूळ व गहू आणून देत असे. याशिवाय सदरचा इसम सुनिल हा कुठे राहतो किंवा कसे, याबाबतचा त्याला ठावठिकाणा माहित नाही. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गाळ्यामध्ये असलेल्या तांदूळ व गव्हाच्या साठ्याची तपासणी केली असता, सदरचा तांदूळ व गव्हाचा साठा ज्या बारदाण्यामध्ये आहे (गोणीमध्ये) त्या गोणीत शासकीय गोदामातून वितरीत होणाऱ्या अन्नधान्याची बाचकी असल्याचे गोण्याच्या बारदानावरुन सकृतदर्शनी दिसून येत आहे.

सदर गाळ्यामधील घटनास्थळीच्या मुद्देमालाचा तपशिल येणेप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | तांदूळ (सर्व साधारण प्रतिचा) एकूण ११३ बाचके (प्रत्येकी ५० किलो भरतीच्या) | ५६५० किलो | १,१३,०००/- |
| २ | गहू एकूण १६३ बाचके (प्रत्येकी ५० किलो भरतीच्या) | ८१५० किलो | १,४६,७००/- |
| ३ | इलेक्ट्रॉनिक्स वजन काटा (५० किलो क्षमतेचा) | १ नग | २,५००/- |
| ४ | इन्व्हेटर मशिन + १२ व्होल्टची ट्युबलर बॅटरी | १ नग | १२,०००/- |
| ५ | रिकामी बारदाने (गोण्या) | १२ नग | ६०/- |
| | | एकूण | २,७४,२६०/- |

त्यानंतर घटनास्थळी श्री. विशाल विजय वाघ, पोलिस शिपाई, बक्कल क्र. ५०३ हे रात्री २१.०० वाजता ड्युटीवर हजर राहिले. त्यांना सदरच्या धाडीची माहिती देण्यात आली. तसेच सदर गाळा क्र. ३ मध्ये असलेल्या जप्त केलेला मुद्देमाल उपस्थित पोलिस शिपाई यांच्या निदर्शनास आणून दिल्या व त्यानंतर पथकातील अधिकारी, पोलिस तसेच पंचांच्या सही शिक्क्यानिशी सदरच्या गाळ्याच्या मागील बाजूस असलेल्या खिडकीच्या आतील बाजूस व बाहेरील बाजूस तसेच गाळ्याच्या दर्शनी भागावर असलेला रोलिंग शटर खाली खेचून सदरचा गाळा कुलूपाने बंद करुन सदर कुलूपास पंचांच्या सही शिक्क्यानिशी जागीच सिलबंद करण्यात आला.

अशाप्रकारे प्रस्तूत प्रकरणी अमित हरिभाई भानुशाली व सुनिल (पूर्ण नांव माहित नाही) या दोघांनी आपआपसात संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारे शासन अनुदानित दराचा तांदूळ व गहू हा गैरमार्गाने हस्तगत करुन तसेच सदरचा साठा मोठ्या प्रमाणावर साठवणूक करुन तो अवैधमार्गाने काळ्या बाजारात स्वत:च्या फायद्यासाठी विक्री करुन त्यांचा मोठ्या प्रमाणावर

नफा कमविण्याचा उद्देश सिध्द झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १०, २) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम १८ (३) (ए.ए.ए.) तसेच ३) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ४, ५, ६, ७ व ८ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली पूर्व येथे गुन्हा नोंद क्र. II २४/२०१२ दिनांक ३०/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन उपरोक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठ्यातून पंचांसमक्ष नमुने घेण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २५/०४/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २५/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांचे लेखी अभिवेदन व अंतरीम आदेशाचे अंमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्तता अहवाल वाचावे क्र. ४ अन्वये प्राप्त झाले आहे. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १६/०५/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस जप्त साठ्याचे मालक अमित हरिभाई भानुशाली हे उपस्थित राहिले. तथापी, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले नाही. परंतू सुनावणीच्या वेळी दिलेल्या खुलाशानुसार त्यांचा वाचावे क्र. ५ अन्वये लेखी जबाब नोंदविण्यात आला आहे. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक १२/०६/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १२/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत.

सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली असून, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

0005
**युक्तिवाद :-**

पोलिस उपनिरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे यांचेकडून दिनांक २५/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात अमित हरीभाई भानुशाली या आरोपीतास दिनांक ३०/०३/२०१२ रोजी अटक केली असुन उर्वरीत सुनिल व मयुर उर्फ महेश गोपाळ भानुशाली हे पाहिजे आरोपी आहेत. सदर अटक व पाहिजे आरोपी यांनी आपसात संगनमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानीत दराने वितरीत होणारा तांदुळ व गहु हा गैरमार्गाने हस्तगत करुन त्याची मोठया प्रमाणावर साठवणुक करुन त्याची अवैध मार्गाने काळ्याबाजारात स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मोठया प्रमाणावर नफा कमाविण्याच्या उद्देशाने विक्री करुन समाजातील गोरगरीब जनतेची व शासनाची फसवणुक केल्याचे नमुद आहे.

दिनांक १६/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित जप्त साठ्याचे मालक अमित हरिभाई भानुशाली यांनी युक्तीवाद केला की, त्याने नमुद गुन्ह्यात घटनास्थळी असलेले गोदाम श्री. आत्माराम पाटील याच्याकडून मासिक ४,०००/- रुपये भाडे करारावर घेतले होते. सदर गोदामामध्ये तो सुनिल नामे इसमाकडून तांदूळ व गव्हाची खरेदी करुन सदरचा साठा तो किरकोळीने विक्री करीत होता. सदर साठ्याचे त्याच्याकडे खरेदी बिले नसून त्याला सुनिल नामे इसमाने बिले दिले नाहीत. सदरचा अन्नधान्याचा साठा त्याने कोणाकडून व कसा खरेदी केला, याबाबत त्याला माहिती नसून त्याने सदरचा साठा नियमितपणे खरेदी करुन मागील ४-५ महिन्यांपासून विक्री करीत होता. त्याला सुनावणीमध्ये सदरचा अन्नधान्याचा साठा हा सुनिल यांनी कोणत्या रेशन दुकानातून घेतला याबाबत विचारणा केली असता, सदर बाबत त्याला माहित नसल्याचे त्याने सांगितले, असे सांगून तसा लेखी जबाब दिलेला आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, या कार्यालयाच्या अधिपत्याखालील फिरते पथकाने मिळालेल्या बातमीनुसार दिनांक २९/०३/२०१२ रोजी आत्माराम पाटील निवास, गाळा नं. ३, तळमजला मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व येथे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकांवर वितरीत होण्याकरिता दिलेल्या तांदूळ व गव्हाचा मोठ्या प्रमाणात

साठा काळ्या बाजाराकरिता ठेवण्यात आल्याचे समजल्याने पथकाने सदर ठिकाणी धाड टाकली असता सदरचा गाळा मयुर उर्फ महेश गोपाळ भानुशाली यांचा असल्याचे चौकशीत आढळून आले. पथकातील अधिकाऱ्यांनी मयुर उर्फ महेश भानुशाली या गाळाधारकास बोलावून घेतले व त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता, मयुर उर्फ महेश भानुशाली यांनी सदरचा गाळा हा आत्माराम पाटील या गाळा मालकाकडून मौखिक मुख्र जबानीनुसार भाडेपट्टीने किराणा मालांच्या व्यवसायाकरिता घेतला असल्याचे सांगुन त्या ठिकाणी त्याचा मावसभाऊ अमित हरिभाऊ भानुशाली यांना किराणा व्यवसायासाठी दिला आहे. तो त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचे भाडे/मोबदला घेत नाही. अमित भानुशाली सदर गाळ्यामध्ये किराणाचा व्यवसाय किंवा अन्य इतर कोणता व्यवसाय करतात किंवा कसे, याबाबत त्याला काही माहित नसल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी मयुर उर्फ महेश भानुशाली यांना पंचांसमक्ष अमित भानुशाली यांना तातडीने बोलावून घेण्याची विनंती केली. त्यानुसार अमित भानुशाली हे गाळा नं. ३ येथे घटनास्थळी उपस्थित झाले. व त्याने सदरचा गाळा नं. ३ उघडला असता सदर गाळ्यामध्ये सर्वसाधारण प्रतिच्या तांदळाच्या एकूण ११३ बाचके व गव्हाच्या एकूण १६३ बाचके (प्रत्येकी ५० किलो भरतीच्या) व इतर मुद्देमाल अधिकाऱ्यांना आढळून आले. सदरचा तांदूळ व गव्हाचा साठा ज्या बारदाणामध्ये आहे (गोणीमध्ये) त्या गोणीत शासकीय गोदामातून वितरीत होणाऱ्या अन्नधान्याची बाचकी असल्याचे गोण्याच्या बारदानावरुन सकृतदर्शनी दिसून आले. अमित भानुशाली यांनी तांदूळ व गव्हाचा साठा कुठून हस्तगत केला, याबाबत सखोल चौकशी केली असता, अमित भानुशाली यांनी सुनिल (पूर्ण नांव माहित नाही) या इसमाकडून विनाख़रेदी बिलांचा साठा रोखीने खरेदी केला असल्याचे सांगुन पंचांसमक्ष सुनिल या इसमाचा ठावठिकाणा माहित नसल्याचे सांगितले. सदरचा सुनिल नामे इसम हा त्याच्या गाळ्यामध्ये स्वत: येऊन तांदूळ व गहू हवे किंवा कसे, याची विचारपूस करुन तो त्याला कमी भावाने (बाजारभावापेक्षाही कमी दराने) तांदूळ व गहू आणून देत असे. सबब, अमित हरिभाई भानुशाली व सुनिल (पूर्ण नांव माहित नाही) या दोघांनी आपआपसात संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारे शासन अनुदानित दराचा तांदूळ व गहू हा गैरमार्गाने हस्तगत करुन तसेच सदरचा साठा मोठ्या प्रमाणावर साठवणूक करुन तो अवैधमार्गाने काळ्या बाजारात स्वत:च्या फायद्यासाठी विक्री करुन त्यांचा मोठ्या प्रमाणावर नफा कमविण्याचा उद्देश सिध्द झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन उपरोक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत गुन्हयातील जप्त साठ्याचे मालक अमित हरिभाई भानुशाली यांनी दिलेल्या जबाबात, सदर गोदामामध्ये तो सुनिल नामे इसमाकडून तांदूळ व गव्हाची खरेदी करुन सदरचा साठा तो किरकोळीने विक्री करीत होता. सदर साठ्याचे त्याच्याकडे खरेदी बिले नसून त्याला सुनिल नामे इसमाने बिले दिले नाहीत. सदरचा अन्नधान्याचा साठा त्याने कोणाकडून व कसा खरेदी केला, याबाबत त्याला माहिती नसून त्याने सदरचा साठा नियमितपणे खरेदी करुन मागील ४-५ महिन्यांपासून विक्री करीत असल्याचे नमुद करुन सदरचा अन्नधान्याचा साठा हा सुनिल यांनी कोणत्या रेशन दुकानातून घेतला याबाबत त्याला माहित नसल्याचे जबाबात नमुद आहे. 0007

पोलिस उपनिरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे यांचे अभिवेदनात अमित हरीभाई भानुशाली या आरोपीतास दिनांक ३०/०३/२०१२ रोजी अटक केली असुन उर्वरीत सुनिल व मयुर उर्फ महेश गोपाळ भानुशाली हे पाहिजे आरोपी आहेत. सदर अटक व पाहिजे आरोपी यांनी आपसात संगनमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानीत दराने वितरीत होणारा तांदुळ व गहु हा गैरमार्गाने हस्तगत करुन त्याची मोठया प्रमाणावर साठवणुक करुन त्याची अवैध मार्गाने काळयाबाजारात स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी मोठया प्रमाणावर नफा कमाविण्याच्या उद्देशाने विक्री करुन समाजातील गोरगरीब जनतेची व शासनाची फसवणुक केल्याचे नमुद आहे. तसेच घटनास्थळी उपस्थित पथकास सदरचा जप्त करण्यात आलेला तांदुळ व गव्हाचा साठा हा शासन नियंत्रीत दराचा सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे वितरीत होणाऱ्या बाचक्यांमध्ये साठा असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आले. अमित हरिभाई भानुशाली याने दिलेल्या जबाबात सदरचा साठा हा विनाखरेदी बिलांचा अवैध मार्गाने खरेदी केलेला साठा असल्याचे घटनास्थळी कबुल केले आहे. सबब, अमित हरिभाई भानुशाली याने सुनिल या इसमाशी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारे शासन अनुदानित दराचा तांदूळ व गव्हाचा साठा हा गैरमार्गाने खरेदी करुन तो अवैधमार्गाने काळ्या बाजारात स्वत:च्या फायद्यासाठी विक्री करीत असल्याचे सिध्द झाले आहे. सबब, जप्त तांदुळ व गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२६/२०१२/जा.२२९, दिनांक १२/०४/२०१२ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला ५० किलो क्षमतेचा इलेक्ट्रॉनिक्स वजन काटा, इन्व्हेटर मशिन, १२ व्होल्टची ट्युबलर बॅटरी व १२ नग रिकामी बारदाने (गोण्या) इ. मुद्देमाल शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली पूर्व येथे गुन्हा नोंद क्र. II २४/२०१२ दिनांक ३०/०३/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) या कार्यालयाचे दिनांक १२/०४/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) घटनास्थळी जप्त करण्यात आलेला ५० किलो क्षमतेचा एक इलेक्ट्रॉनिक्स वजन काटा, एक इन्व्हेटर मशिन, १२ व्होल्टची ट्युबलर बॅटरी व १२ नग रिकामी बारदाने इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) अमित हरिभाई भानुशाली
२) सुनिल
३) मयुर उर्फ महेश गोपाळ भानुशाली
४) गाळ्याचे मालक, आत्माराम पाटील

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली पूर्व यांचे मार्फत)

प्रत, 0009

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानपाडा पोलिस ठाणे, डोबिंवली पूर्व यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकीत पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0010